श्री.संजय नारायण चौधरी सक्तीने सेवानिवृत्त तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी पंचायत समिती अकोले यांचे सेवा निलंबन कालावधीच्या निर्णयाबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
क्र. साप्रवि-२/ग्रांप-३/ ९८e /२०२५
दिनांक - स्वाक्षरी खाली नमूद केलेप्रमाणे

संदर्भ :- १.आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/१६-२०१९/७८५/२०२२ अ.नगर दिनांक १२/१२/२०२२ (सक्तीने सेवा सेवानिवृत्त करणे आदेश)

२. या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र.५३०१८८ दि.१३/०८/२०२४

३. श्री.संजय नारायण चौधरी सक्तीने सेवानिवृत्त तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी पंचायत समिती अकोले यांचा प्रकरणी खुलासा प्राप्त दिनांक २४/०९/२०२४

४.महाराष्ट्र नागरी सेवा सेवा (पदग्रहण अवधी स्वियेत्त सेवा निलंबन व बडतर्फ यांचे काळांतील प्रदाने) नियम १९८१चा नियम ७२ चे (२)

श्री.संजय नारायण चौधरी सक्तीने सेवानिवृत्त तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी पंचायत समिती अकोले यांचे दिनांक २४/०७/२००३ ते दिनांक २९/०५/२०१५ अखेर सेवा निलंबन कालावधीचा निर्णय घेणे आवश्यक असल्याने संदर्भ क्रमांक ०२ अन्वये श्री.संजय नारायण चौधरी सेवानिवृत्त तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी यांना प्रकरणी अंतिम कारणे दाखवा नोटीस देण्यात येऊन खुलासा मागविण्यात आलेला आहे. त्यांनी खुलासा सादर केलेला असुन श्री.चौधरी यांचे खुलाशयाचे अवलोकन करण्यात आलेले आहे. त्यांनी प्रथम वर्ग मा.न्यायालय क्रमांक (३) पिठासन अधिकारी श्रीम.वैशाली अमोल लावंड-कोकाटे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग मा.न्यायालय क्रमांक ३ राहाता यांचा नियमित फौजदार खटला क्रमांक ९५७/२००५ मधील जाहिर निर्णय दिनांक २६/०५/२०२२ अन्वये त्यांची निर्दोष मुक्तता झाली आहे. मा.न्यायालयाचे निर्णयानूसार त्यांचे निलंबन कालावधी दिनांक २४/०७/२००३ ते २९/०५/२०१५ चा निलंबन कालावधी संपुर्ण सेवाकाल धरण्यात येऊन फरकासह वेतन व भत्ते व इतर लाभ मिळावेत. तसेच त्यांचा दिनांक २४/०७/२००३ ते २९/०५/२०१५ अखेरचा सेवा निलंबन कालावधी हा सेवेच्या सर्व कारणासाठी कामावर व्यक्तीत केलेला कालावधी म्हणून समजण्यात यावा, अशी विनंती केलेली आहे.

श्री.संजय नारायण चौधरी यांचा खुलासा मान्य करण्यात येऊन महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वियेत्तर सेवा निलंबन व बडतर्फ यांचे काळांतील प्रदाने) नियम १९८१ चा नियम ७२ चे (२) मध्ये नमूद केलेल्या नियमातील तरतूदीनुसार प्रकरणी नियुक्ती प्राधिकरणास प्रदान असलेल्या अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, श्री.संजय नारायण चौधरी सक्तीने सेवानिवृत्त तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी पंचायत समिती अकोले यांचा दिनांक २४/०७/२००३ ते

दिनांक २९/०५/२०१५ अखेर सेवा निलंबन कालावधी सेवेच्या सर्व कारणांसाठी कामावर व्यतीत केलेला कालावधी म्हणून समजणेत येणे बाबतचे निर्णयाचा आदेश पारित करीत आहे. सदर आदेशाची नोंद श्री.संजय नारायण चौधरी सक्तीने सेवानिवृत्त तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी पंचायत समिती अकोले, यांचे मुळ सेवा पुस्तकात घेणेत यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५११२८०६०१६८ असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 28-11-2025 19:35:28
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.संजय नारायण चौधरी सेवानिवृत्त तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी पंचायत समिती अकोले

द्वारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले

२/- सदरचा आदेश संबंधितांस बजावून बजावलेबाबतची तारखेसह स्वाक्षरीची पोहोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी.